www.lokrakshanay.com
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

• LOKRAKSHANAY • RNI TC NO. MAHBIL10469

•Editor- Rakesh Shankar Gore •Daily •Thane •Volume-01, Issue-204 • Thursday, 28 December 2023 •Pages-04 •Rs.2/-

### अनमोल विचार

"संपूर्ण जगात देवानी फक्त माणसामध्ये हसण्याची गुण दिले आहे ही गुणवत्ता गमावू नका."

## लक्षवेधी

### बेटिंग ॲप्स अन् बनावट कर्ज जाहिरातींवर बंदी घालण्यात येणार; केंद्र सरकारचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली :** बनावट कर्ज ॲप्स आणि बेटिंग ॲप्सवर बंदी घालण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. मंत्रालयाने बेकायदेशीर कर्ज ॲप्स आणि बेटिंग ॲप्स काढून टाकण्याच्या सूचना जारी केल्या आहेत. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने फक्त केवायसी प्रक्रिया बँकांसाठी अधिक व्यापक बनवण्याची विनंती केली आहे. या प्रस्तावित केवायसी प्रक्रियेला 'नो युवर डिजिटल फायनान्स ॲप' असे नाव देण्यात आले आहे. आम्ही बनावट कर्ज ॲप्सच्या जाहिराती थांबवण्याचे काम करत आहोत. अशा बनावट कर्ज ॲप्सच्या जाहिराती अनेक प्लॅटफॉर्मवर दिसतात, असं केंद्रीय आयटी मंत्री राजीव चंद्रशेखर यांनी सांगितले. अलीकडच्या काळत बनावट कर्ज ॲप्सचे जाळे खूप पसरले आहे.

### सूर्य चंद्र मिशन नंतर नवीन वर्षात ISRO या मोठ्या मोहिमेसाठी सज्ज

**नवी दिल्ली :** भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) आपल्या यशस्वी मोहिमांसह जगात एक वेगळा आयाम निर्माण करत आहे. अलीकडेच, चांद्रयान 3 च्या यशस्वी लँडिंगनंतर, इस्त्रोने जगाचे लक्ष वेधून घेतले होते आणि यावेळी पुन्हा एकदा फक्त असेच काही करणार आहे, ज्यामुळे संपूर्ण जगाच्या नजरा इस्त्रोकडे असतील. चंद्र आणि सूर्यानंतर आता इस्त्रो अंतराळातील गूढ उकलणार आहे, म्हणजेच 2024 मध्ये सर्वांना चकित करण्याचा इस्त्रोचा विचार आहे. अंतराळातील क्ष-किरण स्त्रोतांच्या तीव्र ध्रुवीकरणाची तपासणी करण्यासाठी इस्त्रो नवीन वर्षाची सुरुवात पहिल्या क्ष-किरण पोलारिमीटर उपग्रहाच्या प्रक्षेपणाने करणार आहे.

### भारत आणि इटलीमध्ये झाला हा महत्त्वपूर्ण करार..विद्यार्थ्यांना होणार फायदा

**नवी दिल्ली :** भारत सरकार आणि इटली सरकार यांच्यातील स्थलांतर आणि गतिशीलता करारावर स्वाक्षरी करण्याच्या आणि त्याला मान्यता देण्याच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या प्रस्तावाला कार्योत्तर मान्यता दिली आहे, या निर्णयाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या करारामुळे उभय देशातील लोकांचा आपआपसांतील संपर्क वाढेल, विद्यार्थी, कुशल कामगार, व्यावसायिक आणि तरुण व्यावसायिक यांची गतिशीलता वाढेल आणि दोन्ही बाजूंनी होणाऱ्या अनियमित स्थलांतराशी संबंधित मुद्यांवर सहकार्य मजबूत होईल.

### राम मंदिराच्या वाटेवर उभारणार सूर्यस्तंभ..

**नवी दिल्ली :** पुढील महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बहुप्रतिक्षित आणि बहुचर्चित श्रीराम मंदिराचे उद्घाटन मोठ्या दिमाखात केले जाणार असल्यामुळे संपूर्ण अयोध्या नगरी सजली आहे.या निमित्ताने संपूर्ण अयोध्येमध्ये राम मंदिराच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यांवर सूर्यस्तंभ उभारण्यात येणार आहेत. हे सूर्यस्तंभ म्हणजे सौर उर्जेवर प्रज्वलितहोणारे दिवे असणार आहेत. यातील प्रत्येक स्तंभ ३० फूट उंचीचा असणार आहे. रात्रीच्या वेळी प्रदीप्त झाल्यावर सूर्याचा आभास निर्माण होणार आहे.अयोध्या बायपासला नया घाटाजवळील लता मंगेशकर चौकाला जोडणाऱ्या धरम पथ या रस्त्यावर असे ४० खांब बसवले जातील, असे उत्तर प्रदेशच्या अयोध्या विभागाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

### WFIवर लक्ष ठेवण्यासाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन; क्रीडा मंत्रालयाने दिले होते आदेश

**नवी दिल्ली :** भारतीयकुस्ती महासंघ (WFI)बाबत एक महत्वाची माहिती समोर आली आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेने कुस्तीच्या देखरेखीसाठी तीन सदस्यीय समिती स्थापन केली आहे.त्रिसदस्यीय समिती कुस्ती संघटनेचे हे काम पाहणार आहे. ऑलिम्पिक असोसिएशनने ही समिती स्थापन केली आहे. भूपेंद्र सिंह बाजवा या समितीचे अध्यक्ष असतील, एमएम सौम्या आणि मंजुषा कुंवर यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय कुस्ती महासंघाच्या निवडणुकीपूर्वीही हीच समिती भारतीय कुस्ती महासंघावर लक्ष ठेवत होती, कारण माजी अध्यक्ष ब्रिजभूषण यांना निलंबित करण्यात आले होते.

### 'ही केवळ एक नौटंकी आहे..' राहुल गांधींच्या न्याय यात्रेवर भाजप पहिली प्रतिक्रिया

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते आणि पक्षाचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी आता मणिपुर ते मुंबई अशी भारत न्याय यात्रा काढण्याची घोषणा केली आहे. ही यात्रा १४ जानेवारी पासून सुरू होणार असून ती २० मार्च पर्यंत चालणार आहे. भारत जोडो यात्रेपेक्षा या यात्रेचे अंतर जास्त आहे. भारत जोडो यात्रा ही सुमारे ४००० किमीची होती परंतु ही नवीन भारत न्याय यात्रा ६२०० किमीची असेल. १४ राज्यांमधून ही यात्रा जाणार आहे, या यात्रेत राहुल गांधी देशाचा पुर्व, ईशान्य आणि पश्चिम भागाचा दौरा करून देशातील नागरीकांशी संवाद साधणार आहेत. राहुल गांधीच्या यात्रेबाबत आता भाजपने प्रतिक्रिया दिली आहे. ही केवळ एक नौटंकी आहे अशी टीका भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते नलिन कोहली यांनी केली आहे.

### अमित शहा हे देशातले सर्वात अकार्यक्षम गृहमंत्री - प्रियांक खर्गे

**कर्नाटक :** अमित शहा हे स्वतंत्र भारतातील सर्वात अकार्यक्षम गृहमंत्री आहेत अशी टीका कर्नाटकचे मंत्री आणि काँग्रेस नेते प्रियांक खर्गे यांनी केली आहे. मणिपुर मधील सतत अनेक महिने सुरू असलेला हिंसाचार आणि संसदेवरील हल्ला हा त्यांच्या अकार्यक्षमतेचाच पुरावा असून या दोन्ही प्रकरणात त्यांना काहीही करता आलेले नाही असे त्यांनी म्हटले आहे. प्रियांक खर्गे हे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे चिरंजीव आहेत. नागरिकत्व दुरुस्ती कायद्याच्या अंमलबजावणीबाबत अमित शहा यांनी नुकत्याच केलेल्या एका विधानावर त्यांनी ही प्रतिक्रीया दिली आहे. ते म्हणाले की अमित शहा यांच्याकडे सीएए कायदा या विषयावर बोलण्या वेळ आहे.

# महायुतीत वादाची ठिणगी !

# बच्चू कडू साथ सोडणार असल्याची चर्चा



**■मुंबई। यश सावंत,**

भाजप आणि शिंदे गट यांच्यासह अजित पवार यांचा मोठा गट सत्तेत सहभागी झाला आहे. याच महायुतीत आता वादाची ठिणगी पडली आहे. भाजप आणि शिंदे गटाचा अजित पवार यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. तर, दुसरीकडे महायुतीत सहभागी असलेले अपक्ष आमदार बच्चू आमदार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याची चर्चा रंगलेय. बच्चू कडू महायुतीमधून बाहेर पडणार असल्याची चर्चा रंगली आहे. यामुळे राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. बच्चू कडू महायुती सोडणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आज आणि उद्या अमरावती दौऱ्यावर आहेत. याच दौऱ्यात शरद पवार आणि बच्चू कडूंची त्यांच्या निवासस्थानी भेट होणार आहे..

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर पवार बच्चू कडू यांची भेट घेणार असल्याने चर्चांना उधाण आलंय.. 2024 च्या लोकसभा निवडणुकीत बच्चू कडू उमेदवार देणार आहेत. कडू यांचे निकटवर्तीय रवींद्र वैद्य प्रहारचे उमेदवार असण्याची दाट शक्यता आहे.. त्याच पार्श्वभूमीवर ही भेट होणार असली तरी बच्चू कडू काय निर्णय घेतात याकडे सर्वांचं लक्ष लागलंय. बच्चू कडूंचं मविआत स्वागत आहे असं वक्तव्य काँग्रेसच्या यशोमती ठाकूर यांनी केलंय. बच्चू कडू महाविकास आघाडीत येणार असतील तर स्वागत असल्याचं यशोमती ठाकूर म्हणाल्या. शरद पवार आणि बच्चू कडू भेट होत असेल तर चांगली गोष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं. अमरावती जिल्हा दौऱ्यात पवार उद्या बच्चू कडूंची भेट घेणार आहेत. या भेटीबाबत यशोमती ठाकूर यांनी ही प्रतिक्रिया दिली.

**■ पुण्यात महायुतीत ठिणगी**

अजित पवार पुण्याचे पालकमंत्री झाल्यानंतर विकासनिधी मिळत नसल्याचा भाजप आणि शिंदे गटाचा आरोप आहे. भाजप आणि शिंदे गटाच्या या नेत्यांनी पुण्याचे जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांच्याकडे अजित पवारांची तक्रार केलीय. तब्बल 800 कोटींचा विकास निधी अजित पवारांनी मंजूर केलाय. हा 800 कोटी रुपयांचा निधी तात्काळ रद्द करण्यात यावा अन्यथा कोर्टात जाण्याचा इशारा देण्यात आलाय.

**निवडणुकीच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मैदानात उतरणार**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मैदानात उतरणार आहेत. फेब्रुवारी महिन्यात दररोद देवेंद्र फडणवीसांच्या तीन सभा असणार आहेत. तसंच देवेंद्र फडणवीस राज्याचा दौराही करणार आहेत. त्यांच्या दौऱ्याचं वेळपत्रक लवकरच ठरणार आहे. लोकसभा निवडणुकीत 45 हून अधिक जागा जिंकण्याचा भाजपचा निर्धार आहे.

## निवडणुकीच्या तोंडावर मुंबई आणि राज्यात वातावरण निर्मितीसाठी राहुल गांधी यांची यात्रा काँग्रेसला उपयुक्त



**■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,**

राहुल गांधी यांच्या भारत न्याय यात्रेचा समारोप २० मार्चला मुंबईत होणार असल्याने लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मुंबई व राज्यात वातावरणनिर्मितीसाठी काँग्रेसला या यात्रेचा चांगला वापर करता येऊ शकेल. वर्धापनदिनासाठी नागपूर ते यात्रेच्या समारोपाकरिता मुंबईची निवड करण्यात आल्याने काँग्रेस पक्षाचा लोकसभेच्या ४८ जागा असलेल्या महाराष्ट्रावर अधिक भर असल्याचे दिसते. कर्नाटक आणि तेलंगणा या दक्षिणेकडील दोन राज्यांमधील विजयानंतर काँग्रेसच्या राज्यातही आशा पल्लवीत झाल्या आहेत. शिवसेना आणि राष्ट्रवादीतील फुटीनंतर काँग्रेसला राज्यात संधी दिसत आहे.

राहुल गांधी यांच्या मणिपूर ते मुंबई या यात्रेचा समारोप २० मार्चला मुंबईत होणार आहे. याच दरम्यान लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू झालेली असेल. २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीची घोषणा १० मार्चला झाली होती. यंदाही मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात घोषणा होऊ शकते. कदाचित राहुल गांधी यांच्या यात्रेचा प्रभाव पडत असल्यास सत्ताधारी भाजपचा निवडणुकीचा कार्यक्रम लवकर जाहीर करण्यासाठी दबाव वाढण्याचीही शक्यता काँग्रेसच्या वतुर्ळात व्यक्त केली जाते. गुजरातमधून राहुल गांधी यांची बस यात्रा महाराष्ट्रात प्रवेश करणार आहे. गुजरातची हद्द ते मुंबईपर्यंत राज्यात यात्रेचा मार्ग असेल. सूरतमार्गे तलासरीतून यात्रा दाखल झाल्यास पालघर, ठाणे, मुंबई असा प्रवास होईल. नंदुरबार-नवापूरमार्गे राज्यात यात्रेने प्रवेश केल्यास नंदुरबार, जळगाव, धुळे, नाशिकहून ठाणेमार्गे यात्रा मुंबईत येईल. राहुल गांधी यांच्या यात्रेचा मुंबईत जास्तीत जास्त फायदा करून घेण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असेल.

## दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना शासकीय नोकऱ्या; उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा निर्णय



**■मुंबई। अनिकेत भंकाळ,**

नक्षलवादी, दहशतवादी, दरोडेखोरांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या किंवा कायमस्वरूपी जायबंदी झालेल्या उच्च शिक्षण क्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर प्राधान्याने शासन सेवेत नियुक्ती देण्याचा निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतला आहे. राज्य शासकीय सेवेत कार्यरत असताना मृत्युमुखी पडलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर शासन सेवेत सामावून घेण्याचे धोरण आहे. गट क व गट ड संवर्गातील सरळसेवा कोटयातील प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या २० टक्के पदे अनुकंपा तत्त्वावर भरण्यात यावीत, असे सर्वसाधारण धोरण आहे. १ जानेवारी २०२० पासून हे धोरण राज्य शासकीय सेवेतील अधिकाऱ्यांनाही लागू केले आहे. सामान्य प्रशासन विभागाने त्याबाबतचे वेळोवेळी आदेश काढलेले आहेत. अनुकंपा नियुक्त्यांचे हे सर्वसाधारण धोरण उच्च शिक्षणातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागू आहेच, त्याचबरोबर आता अकृषी विद्यापीठे, शासकीय, खासगी अनुदानित महाविद्यालये, तंत्र शिक्षण संचालनालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ-लोणेरे, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, लक्ष्मीनारायण अभिनव विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, तसेच अनुदानित अभिमत विद्यापीठे यांमधील शासनमान्य गट अ ते गट ड या पदांसाठी स्वतंत्र अनुकंपा धोरण जाहीर केले आहे.

## '...तर युतीत फूट पडायला वेळ लागणार नाही', शिंदे गटातील नेत्याचा भुजबळांना इशारा



**■मुंबई। विशाल कारंडे,**

देशात २०२४ होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीत जागावाटपावरून तणाव सुरू आहे. अशातच अन्न आणि नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळांनी यांनी जागावाटपावर भाष्य केलं आहे. 'जेवढ्या जागा शिंदे गटाला मिळतील, तेवढ्याच जागा अजित पवार गटाला मिळाल्या पाहिजेत,' असं विधान छगन भुजबळांनी केलं होतं. यावरून शिंदेंच्या शिवसेनेतील आमदार संजय शिरसाट यांनी भुजबळांना इशारावजा सल्ला दिला आहे. अजित पवार आमच्या पक्षाचे प्रमुख आहेत. जागावाटपाबाबत अजित पवारांनी आपलं मत मांडलं आहे. शिंदे गटाचे जेवढे आमदार आलेत, तेवढेच अजित पवार गटाचे आमदार आले आहेत. त्यामुळे शिंदे गटाला जेवढ्या जागा मिळतील, तेवढ्याच जागा अजित पवार गटाला मिळाल्या पाहिजेत, अशी मागणी छगन भुजबळांनी केली. यावर बोलताना संजय शिरसाट म्हणाले, छगन भुजबळांना आता वेळ मिळाल्यानं ते महायुतीवर बोलत आहेत. छगन भुजबळ ज्येष्ठ नेते असल्यानं अशी विधानं करायला नकोत.

## 'व्याघ्रभूमीत आता ऑलिम्पिक खेळाडूही घडतील', मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास; ६७ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

**■चंद्रपूर। दिगंबर जाधव,**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात सुरू केलेल्या मिशन ऑलिम्पिक २०३६ची सुरुवात चंद्रपूर जिल्ह्यातील विसापूर क्रीडांगण येथून झाली आहे.

२०३६ मध्ये भारतात ऑलिम्पिक स्पर्धेचे आयोजन करण्याचे व सर्वाधिक पदके जिंकण्याचे पंतप्रधानांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र आघाडीवर असेल. चंद्रपूरच्या व्याघ्रभूमीत आता ऑलिम्पिक खेळाडूही घडतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. मिशन ऑलिम्पिक २०३६ हे ध्येय डोळ्यापुढे ठेवून राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर



मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून बल्लारपूर तालुका क्रीडा संकुलात आयोजित ६७ व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते झाले.

यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, क्रीडामंत्री संजय बनसोडे, पालकमंत्री मुनगंटीवार, आ. रामदास आंबटकर, द्रोणाचार्य-अर्जुन व पद्मश्री पुरस्कारप्राप्त बहादूरसिंग चव्हाण, ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेती हिमा दास, राष्ट्रीय खेळाडू ललिता बाबर, मालविका बन्सोड आणि व अधिकारी यावेळी उपस्थित होते. जय जय महाराष्ट्र माझा या राज्यगीताने आणि दिप व मशाल प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ऑलिम्पिक खेळाडू मनजीत सिंग याने मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे मशाल सुपूर्द केली. मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह सर्व पाहुण्यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केले.

## बाळासाहेब, बाबरी आणि राम मंदिरावर शरद पवारांचं पहिल्यांदाच मोठं विधान!



**■मुंबई। सचिन कदम,**

अयोध्येतल्या राम मंदिर लोकार्पण सोहळ्याची जोरदार तयारी सुरु आहे. 22 जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते श्रीराम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. या सोहळ्यावरुन देशासह राज्याच्या राजकारणात महाभारत सुरु झाले आहे. नेत्यांना देण्यात येणाऱ्या निमंत्रणावरुन वाद विवाद सुरु आहेत. या वादात आता राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी देखील उडी घेतली आहे. बाळासाहेब, बाबरी आणि राम मंदिरावर शरद पवारांचं पहिल्यांदाच मोठं विधान केले आहे. शरद पवार यांनी थेट भाजपवर निशाणा साधला आहे. राम मंदिर उभारल्याचा आनंद आहे. पण, बाबरी पडली तेव्हा एकच नेता सांगत होता 'बाबरी आम्ही पाडली' ते बाळासाहेब ठाकरे होते. बाबरी पाडण्याची जबाबदारी एकट्या बाळासाहेब ठाकरेंनी घेतली असं म्हणत शरद पवार यांनी भाजपवर अप्रत्यक्षपणे हल्लाबोल केला आहे.

राममंदिर उदघाटनाचं निमंत्रण नाही असं राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारांनी सांगितलंय. सहसा मी मंदिरात जात नाही अशी पुस्तीही त्यांनी जोडली. राममंदिराचं भाजप राजकारण करतं की व्यवसाय माहित नाही असा टोला देखील त्यांनी लगावला. 22 जानेवारीला श्रीराम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे.. यासाठी जगभरातल्या नेत्यांसोबत भारतातल्या विरोधी पक्षाच्या नेत्यांनाही निमंत्रण देण्यात आलंय..

## मला जेलमध्ये जावं लागलं तरी मी या गरिबांना न्याय मिळवून देणार




**■रत्नागिरी। भावना जैन,**

अधिकाऱ्यांची देखील मानसिकता लागते केवळ मंत्री सकारात्मक असून केवळ चालत नाही माझ्या राजकीय जीवनामध्ये मी नाही हा शब्द क्वचित वापरला असेल, असे सांगत उदय सामंत यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील ३४७ कर्मचाऱ्यांना उद्योग विभागाच्या आस्थापनेवरील नियुक्तीपत्र देताना मोठा किस्सा सांगितला. तसेच यापूर्वी केवळ डोंगर घ्यायचे आणि जमीन म्हणून विकायचे हेच उद्योग झाले, अशा शब्दात त्यांनी विरोधकांचाही समाचार घेतला आहे. माझ्या आयुष्याच्या पाप पुण्यामध्ये माझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने मी गरीब लोकांना न्याय देऊ शकलो ही नोंद होईल म्हणून या कार्यक्रम रत्नागिरी येथे घेण्याचे मान्य केले. हे रखडलेलं काम नियतीच्या मनात उदय सामंत उद्योग मंत्री झाल्यावरच होणार होतं दुसऱ्या बोर्डाच्या मीटिंग नंतर माज्याकडे मिनिट्स जेव्हा फायनल सहीला माज्याकडे आले त्यावेळेला मला असं सांगण्यात आले की आपण केवळ ८८ लोकांचे काम करू शकतो पण त्या दिवशी मी सही करताना सांगितलं की करायचं तर ३४७ लोकांचं सगळ्यांचं काम करायचं यासाठी मला जेलमध्ये जावं लागलं तरी चालेल तुम्हाला जे काय लिहायचं ते लिहा क्याग येऊन दे नाहीतर आणखी काही येऊ दे जेलमध्ये मी जाईन पण या लोकांना न्याय मिळवून देईन अशी भूमिका आपण घेतली आणि मग त्यानंतर तुषार मठकर यांच्यासारखा चांगला अधिकारी आपल्याला मिळाला आणि मग या ३४७ कर्मचाऱ्यांचा निर्णय घेतला.

## नाना पाटेकर खडकवासला मतदारसंघातून निवडणूक लढविणार का?



**■मुंबई। विशाल पाटील,**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुका जवळ आल्यानंतर सिनेसृष्टीतील कलाकार निवडणुकीला उतरणार असल्याच्या चर्चांणा उधाण येते. अभिनेत्री माधुरी दीक्षित मुंबईतून लोकसभेत उतरणार आणि नाना पाटेकर हे खडकवासला विधानसभा मतदारसंघासाठी इच्छूक असल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. एका वृत्तवाहिनीवर बोलताना नाना पाटेकर यांनी राजकारणाबाबत काही मतं व्यक्त केली होती त्यानंतर सदर चर्चा सुरू झाली. याबाबतचा प्रश्न राष्ट्रवादीचे नेते, खासदार शरद पवार यांना अमरावती येथे पत्रकारांनी विचारला, त्यावर शरद पवार यांनी एका वाक्यात उत्तर दिले. एका वृत्तवाहिनीशी बोलत असताना नाना पाटेकर यांनी २०२४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच नेतृत्वाखालचे सरकार येणार असे म्हटले होते. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे त्यांनी खडकवासला मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची इच्छा असल्याचे बोलून दाखविले होते, अशा बातम्या अनेक माध्यमांनी दिल्या होत्या. मात्र त्यांनी स्वतःहून जाहीरपणे यावर अद्याप भाष्य केलेले नाही. सिंहगड येथे नाना पाटेकर यांचे फार्महाऊस आहे. त्यामुळे ते बराच काळ खडकवासला मतदारसंघात मुक्कामी असतात.

## काळ आला होता पण... सीपीआरने वृद्ध महिलेच्या हृदयाची टिकटिक पुन्हा सुरू



**■सांगली। सचिन कदम,**

हॉटेलमध्ये नाष्टा करत असतानाच एक वृद्ध महिला खुर्चीवरून अचानक खाली कोसळली. सोबत असलेल्या नातेवाईकांना काही सुचण्यापुर्वीच तिच्या हृदयाची धडधड थांबली. याच वेळी एनसीसीमधील शिबीरात सीपीआरचे प्रात्यक्षिक केलेला युवक पुढे आला. त्याने प्रसंगावधान दाखवत वृद्ध महिलेच्या बंद पडलेल्या हृदयाची टिकटिक पुन्हा सुरू केली. हा युवक होता तासगाव तालुक्यातील लोंढे या गावचा संतोष पाटील! आणि हॉटेल होतं, सोलापूर जिल्ह्यातील कामती येथील. सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयात शिक्षण घेणारा संतोष पाटील हा शुक्रवारी पथसंचलनासाठी बेगमपुरहून निघाला होता. कामती गावात एका हॉटेलमध्ये नाष्टा करण्यासाठी थांबला. दुपारी अकरा वाजेच्या सुमारास हॉटेलमध्ये नाष्टा घेण्यासाठी थांबलेली ५८ वर्षांची महिला हृदयविकाराचा झटका आल्याने अचानक कोसळली. वेदनेने काही काळ तडफडली आणि काही क्षणातच सगळे शांत झाले. तिच्या हृदयाचे ठोके थांबले होते. आजूबाजूची मंडळी काय करायचं? या विवंचनेत असतानाच कुणी नाकाला कांदा लावा, डाव्या पायाचे चप्पल हुंगायला द्या, असा तर कुणी तात्काळ डॉक्टरांना बोलवा अशी साद देत होते, तर कुणी महिलेला वारे घालण्याचा प्रयत्न करीत होते.

## संपादकीय

राकेश शंकर गोरे

# शाळेच्या वेळेबाबत वेळीच जागे व्हा!



मुलांची झोप पूर्ण होत नसल्याने शाळेच्या वेळा पुढे ढकलण्याची सूचना राज्यपालांनी केली. हा बदल केल्यास होणाऱ्या अनिष्ट परिणामांकडे लक्ष वेधणारा लेख. महाराष्ट्राच्या राज्यपालांनी शाळेच्या वेळेबाबत केलेल्या सूचनेवरून सध्या राज्यातील शैक्षणिक वतुर्ळात जोरदार चर्चा सुरु झाली आहे. अलीकडच्या काळात बदलत्या जीवनशैलीमुळे मुलांचे रात्रीचे जागरण वाढत असल्याने ते उशिरा झोपतात व सकाळी भरणाऱ्या शाळांमुळे त्यांना लवकर उठावे लागत असल्याने त्यांची पुरेशी झोप होत नाही.

त्याचा त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता, शाळांची वेळ बदलून उशिरा ठेवावी, अशी सूचना राज्यपालांनी केली आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम रहावे, ही यामागची भावना असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, राज्यपाल महोदयांची सूचना अवास्तव, अव्यवहार्य आहे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

याचे कारण म्हणजे, विद्यार्थ्यांच्या आरोग्याची जोपासना करायची असेल तर त्यांनी रात्री लवकर झोपावे आणि सकाळी लवकर उठावे, असे भारतीय संस्कृती आणि आयुर्वेद सांगते.

विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी सकाळी लवकर उठून योग आणि अभ्यास करणे हितावह असल्याचे वेद आणि पुराणांमध्ये सांगितले आहे. आयुर्वेदानुसार सकाळी ब्रह्ममुहूर्तावर उठणे अत्यंत आरोग्यदायी असून सकाळी मोठ्या प्रमाणात मिळणाऱ्या प्राणवायूमुळे शरीर आणि मन ताजेतवाने राहते. तसेच शरीराची प्रतिकारशक्ती वाढून ते निरोगी राहण्यास मदत होते. तसेच, सकाळी लवकर उठून केलेला योग दुर्धर व्याधींवर रामबाण उपाय मानला जातो.

विद्यार्थ्यांचे शारीरिक स्वास्थ्य लक्षात घेता, सकाळी लवकर उठणे आवश्यक असून किमान शाळेच्या वेळांमुळे तरी ते लवकर उठतात. सकाळच्या नैसर्गिक वातावरणाचा प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष लाभ त्यांना मिळतो. शाळेच्या वेळा उशिरा ठेवल्यास शाळकरी मुले अधिक आळशी बनून आरोग्यदृष्ट्या आणखी दुर्बल होतील, अशी शक्यता नाकारता येत नाही.

वाहतूक व्यवस्थेचे नियोजन

दुसरीकडे, शाळेच्या वेळा ह्या नियमित कार्यालयीन वेळेपेक्षा वेगळ्या ठेवण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, वाहतूकव्यवस्थेचे नियोजन हे होय. शाळेच्या वेळा आणि कार्यालयीन वेळा वेगवेगळ्या ठेवल्याने एकाच वेळी वाहतूकव्यवस्थेवर येणारा ताण कमी होण्यास मदत होते. याउलट शाळा आणि कार्यालयीन वेळा सारख्या केल्यास रस्त्यांवरील वाहतूक वाढून वाहतूक कोंडी आणि अपघातांचे प्रमाण वाढण्याचा धोका अधिक आहे.

त्यामुळे शाळा आणि कार्यालयीन वेळा यांत अंतर असणे गरजेचे आहे. तसेच, शाळा आणि कार्यालयीन वेळा भिन्न ठेवण्याचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे वीजवापराचे नियोजन हेही आहे. शाळा आणि कार्यालयीन वेळा सारख्या ठेवल्यास एकाच वेळी विजेचा मागणी वाढल्याने विजेची टंचाई वाढू शकते. त्यादृष्टीने वीजवापरात सुरळीतपणा आणण्यासाठी शाळा आणि कार्यालयीन वेळा यांत अंतर ठेवले जाते. याबाबींचा विचार करता, शाळेच्या वेळा ह्या कार्यालयीन वेळेपेक्षा भिन्न असणे गरजेचे आहे.

वास्तविकतः अलीकडील काळात लोकांच्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल होत आहेत. मोबाईल आणि इंटरनेटचा अतिवापर वाढल्यामुळे रात्री उशिरापर्यंत जागरण वाढत आहे. इंटरनेट, मोबाईल आणि सामाजिक माध्यमांत पालकांनी स्वतःला इतके गुंतवून घेतले आहे की, रात्रीचे बारा आणि एक कधी वाजतात हे पालकांच्याही लक्षात येत नाही. तर पालक उशिरापर्यंत जागे राहिल्याने मुलेही उशिरापर्यंत जागे राहतात, हे खरे.

सकाळी लवकर शाळा असल्याने मुलांना लवकर उठावे लागते. त्यामुळे त्यांची पुरेशी झोप होत नाही, हा राज्यपालांचा दावा खरा असला तरी, रात्री उशिरापर्यंत जागरण करणे हेच मुळात निसर्ग आणि आयुर्वेदाच्या विरुद्ध आहे. विशेष म्हणजे रात्री उशिरापर्यंत होणारे जागरण उत्पादक की अनुत्पादक याचा विचार करता, ते अनुत्पादक स्वरुपाचेच अधिक आहे, हे समोर येते. मग यात शाळेच्या वेळेचा काय दोष?

त्यामुळे रात्रीचे अनुत्पादक जागरण, मुलांची न होणारी झोप आणि त्याचे आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम लक्षात घेता, पालकांनी स्वतःला शिस्त लावून रात्रीच्या जागरणावर मयार्दा आणणे अधिक आवश्यक आहे. त्यादृष्टीने रात्रीच्या टीव्ही, मोबाईल, इंटरनेट वापरावर काही मयार्दा आणता येतील का, याचा खऱ्या अर्थाने विचार होणे अधिक योग्य राहील. शाळेच्या वेळा बदलण्यामुळे विद्यार्थी अधिक आळशी होऊन शैक्षणिक कामगिरीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. याचा गांभीयार्ने विचार व्हायला हवा.

# SUPERFOOD SWEET POTATO : KNOW THESE 5 BENEFITS OF SHAKARKANDI



Sweet potatoes, locally known as Shakarkandi, are not only a delicious addition to our plates but also pack a powerful nutritional punch. These vibrant tubers are often referred to as a 'superfood' due to their numerous health benefits. Let's explore five compelling reasons why incorporating sweet potatoes into your diet can contribute to your overall wellness.

**Extremely nutritious:** Sweet potatoes are a nutritional powerhouse, loaded with essential vitamins and minerals. They are an excellent source of vitamin A, which is crucial for maintaining healthy vision, skin, and the immune system. Additionally, sweet potatoes provide a good dose of vitamin C, potassium, and fibre, making them a well-rounded choice for a nutrient-dense diet.

**Powerful antioxidant:** Shakarkandi is rich in antioxidants, particularly beta-carotene. Antioxidants play a vital role in neutralising free radicals in the body, helping to prevent cell damage and reduce the risk of chronic diseases. Regular consumption of sweet potatoes can contribute to a healthier immune system and overall cellular health.

**Regulates blood sugar:** Despite being naturally high in sugar and starch, sweet potatoes have a low glycemic index, releasing sugar into the bloodstream slowly. This gradual release helps control elevated blood sugar levels, making them suitable for diabetes management. The fibre in sweet potatoes, approximately 2.5 grams in half a cup, further aids in diabetes prevention by lowering the risk of developing type 2 diabetes.

**Cognitive function support:** The nutrients found in sweet potatoes, such as vitamins A and C, are essential for brain health. These vitamins, along with antioxidants, contribute to cognitive function and may help reduce the risk of age-related cognitive decline. Including sweet potatoes in your diet can be a tasty way to support your brain health.

**Improves skin health:** The beta-carotene in sweet potatoes not only benefits internal health but also contributes to radiant skin. This antioxidant is converted into vitamin A in the body, which plays a crucial role in maintaining skin health. Regular consumption of sweet potatoes may help improve skin tone and reduce the signs of ageing.

# 'हा महाराष्ट्र संतांचा आहे, santa चा नाही', ख्रिसमस साजरा केल्यामुळे केतकी माटेगाकर ट्रोल



केतकी माटेगावकर ही लोकप्रिय गायिका आहे. आपल्या सुमधूर आवाजाने केतकी प्रेक्षकांचं मनोरंजन करते. तिने गायलेली अनेक गाणी हिटही ठरली आहेत. केतकी सोशल मीडियावरही प्रचंड सक्रिय असल्याचं पाहायला मिळतं. पण, ती पुन्हा एकदा सोशल मीडियावर ट्रोल झाली आहे. नाताळच्या शुभेच्छा देत फोटो पोस्ट केल्यामुळे केतकीवर टीकेची झोड उठवण्यात आली आहे. केतकीने ख्रिसमस साजरा केल्यानंतर इन्स्टाग्रामवर फोटो शेअर केले. यामध्ये केतकीने लाल रंगाची सांताक्लॉजची टोपी घातली आहे. यावेली केतकी चेक्स क्रॉप टॉप आणि निळ्या रंगाच्या जिन्समध्ये दिसली. तर बाजूला ख्रिसमस ट्री दिसत आहे. केतकीने हे फोटो शेअर करत कॅप्शनमध्ये 'Too much of holiday fever!' असे लिहिले. या फोटोंवरून तिला ट्रोल केले जात आहे.केतकीच्या पोस्टवर एका युजरने लिहले, 'आज गीता जयंती आणि तुळशी पूजन दिवस पण आहे'. तर आणखी एका युजरने म्हटले, 'हा महाराष्ट्र संतांचा आहे, २ल्ल३ चा नाही'. तर एकाने कमेंट केली, 'केतकी हे बरोबर नाही ग.... आपली संस्कृती काय आपले कुळ. आपली परंपरा हे भारतीय आहे'. एका युजरने संस्कृतीचे धडे देत लिहले, 'मराठी माणूसच मराठी संस्कृतीची अस्मिता जपायला तयार नाहीए. केतकीच नाही बाकीही मराठी celebrities च्या posts पाहून दिसतंय'.

यापुर्वीही केतकीला बॉडी शेमिंगला सामोरं जावं लागलं होतं. यावर मात्र सोशल मीडियावर भलीमोठी पोस्ट करत तिने ट्रोल करणाऱ्यांना आणि बॉडी शेम करणाऱ्यांना चांगलंच सुनावलं होतं. २०१४ साली रिलीज झालेल्या टाईमपास सिनेमातील दगडू आणि प्राजूने प्रेक्षकांच्या मनात घर केले

# नेमकं काय आहे 'श्रीदेवी प्रसन्न'? सई ताम्हणकरच्या पोस्टमुळे सोशल मीडियावर एकच चर्चा



टिप्स फिल्म्स प्रस्तुत आणि कुमार तौरानी यांची निर्मिती असलेला 'श्री देवी प्रसन्न' हा येत्या ०२ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे मोशन पोस्टर नुकतेच रिलीज करण्यात आले. २श्रीदेवी प्रसन्न२ या चित्रपटातून मराठी मनोरंजन विश्वासह बॉलीवूडलाही भुरळ घालणारी मोस्ट ग्लॅमरस अभिनेत्री सई ताम्हणकर आणि स्मार्ट अँड डॅशिंग म्हणून ओळखला जाणारा अभिनेता सिद्धार्थ चांदेकर अशी भन्नाट आणि बेमिसाल जोडी प्रथमच रुपेरी पडद्यावर एकत्र आहे. आजवर अनेक हीट चित्रपट देणारे हे दोन्ही दमदार कलाकार एकत्र येऊन एक वेगळीच प्रेमकहाणी फुलवणार आहे. या निमित्ताने नव्या वर्षात, एक नवी आणि आगळीवेगळी लव्ह स्टोरी आपल्या लाडक्या जोडीसह प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. सई ताम्हणकर आणि सिद्धार्थ चांदेकर यांच्या प्रमुख भूमिकेसह सुलभा आर्या, सिद्धार्थ बोडके, रसिका सुनील, संजय मोने, वंदना सरदेसाई, समीर खांडेकर, आकांक्षा गाडे, रमाकांत डायमा, शुभांगी गोखले, पाहुल पेठे, पल्लवी परांजपे, पूजा वांखेडे, सिद्धार्थ महाशब्दे, जियांश पराडे अशी दमदार कास्ट या चित्रपटात आहे. त्यामुळे श्रीदेवी आणि प्रसन्न यांच्या लव्हस्टोरी सोबत हा एक कंप्लीट फॅमिली सिनेमा आहे.

# 'हॉलिवूडचं बिनधास्तपणे कौतुक, तेच आम्ही केलं तर संस्कृती आड...'; प्रिया बापट संतापली



पिंपरी अभिनय कौशल्याच्या जोरावर प्रेक्षकांचं मनोरंजन करणारी अभिनेत्री म्हणजेच प्रिया बापट. सोशल मीडियावर प्रिया बापट बरीच ॲक्टिव्ह असते. नाटक, वेबसीरिज आणि सिनेमांमुळे प्रिया चर्चेत येते. दरम्यान आता ती वेगळ्या कारणामुळे चर्चेत आली आहे. मराठी अभिनेत्रींना संस्कृतीवरुन ट्रोल करणाऱ्यांवर प्रियाने अगदी परखडपणे तिचं मत मांडलं. तिच्या वक्तव्याने साऱ्यांचं लक्ष वेधलं आहे. प्रिया बापटने आरपारच्या 'वूमन की बात' या सेगमेंटमध्ये बोल्ड सीनवर भाष्य केले. ती म्हणाली, 'खुपदा कलाकारांना सोयीच्या हव्या त्या साच्यात पाहण्याचा प्रयत्न केला जातो. ते योग्य नाही. हिंदीतील, इतर भाषांमधील अथवा हॉलिवूडचे सिनेमे पाहताना तुम्ही त्यांच्याकडे पात्र म्हणून पाहता. त्यांचं कौतुक करता. काय मस्त काम केलं आहे, असे म्हणता. पण, जर हेच तुमच्या मराठी मुलीने केले की तुमची मराठी संस्कृती का आड येते, असा सवाल प्रियाने प्रेक्षकांना केला. पुढे ती म्हणाली, 'मराठी मुलगी मोठ्या पडद्यावर काम करु शकते. एक पात्र उत्तमप्रकारे साकारू शकते याचा तुम्हाला अभिमान का नाही. तुम्ही कशाला महत्त्व देता, एखाद्या पात्राच्या वैयक्तिक आयुष्यातील त्या सीनला की जो मी संपुर्ण पात्राचा ग्राफ उभारलं त्याला. काम निवडताना सुद्धा मी या सगळ्या गोष्टींचा विचार करुन निवडते. कोणी अंधारात ठेवून माझ्याकडून हे काम करुन घेत नाही.



# 'देवमाणूस'ची डिंपल खऱ्या आयुष्यात आहे भलतीच बोल्ड

अयोध्येमध्ये छोट्या पडद्यावर गाजलेली मालिका म्हणजे देवमाणूस. किरण गायकवाड याची मुख्य भूमिका असलेली ही भूमिका छोट्या पडद्यावर विशेष गाजली. किरण गायकवाडप्रमाणेच या मालिकेतील अन्य कलाकारही विशेष लोकप्रिय झाले. त्यातलीच एक अभिनेत्री म्हणजे अस्मिता देशमुख. मालिकेत खेडेगावातील साध्याशा मुलीची भूमिका साकारणारी अस्मिता खऱ्या आयुष्यात चांगलीच बोल्ड आणि बिनधास्त आहे. सोशल मीडियावर अस्मिता सक्रीय असून कायम तिचे नवनवीन फोटो चाहत्यांसोबत शेअर करत असते. अस्मिताचा जन्म पुण्यातील देहू येथे झाला असून लहानपणापासून तिला अभिनयाची आवड आहे. देवमाणूस मालिकेमुळे डिंपलला खरी लोकप्रियता मिळाली. यापूर्वी तिने काही शॉर्ट फिल्ममध्ये वगैरे काम केलं आहे. सध्या अस्मिता 'तुझी माझी जोडी जमली' या सन मराठीवरील मालिकेत झळकत आहे. सोशल मीडियावर अस्मिता चांगलीच सक्रीय आहे.


## HEALTH AND SPORTS

# FEISTY INDIA AIM TO RESURRECT POOR ODI RECORD AGAINST AUSTRALIA IN THREE-MATCH SERIES



**NEW DELHI :** Flying high after two consecutive Test wins, India Women will now shift focus to white-ball cricket as they take on seven-time world champions Australia in a three-match ODI series, looking to resurrect their dismal record in the format, on Thursday. India have been in top form winning their last three contests, two Tests and one T20I, after losing the first two T20Is to England and concede the three-match series in this long home season. After crushing England by a record 347 runs in the one-off Test, India carried the momentum to defeat Australia by eight wickets last week here at the Wankhede Stadium, which will also be the venue for the three-match ODI series. Given their current form, India will eye more success in the fixtures lined up but the Harmanpreet Kaur-led side would know that it has a huge task cut out against Australia who have historically dominated them in 50-overs cricket. India have only 10 wins and 40 losses to show from 50 ODIs against Australia overall, while at home, their record has been simply terrible. With only four wins in 21 ODIs and 17 defeats at home, India have not beaten Australia in any of their last seven matches playing at home since February 2007. In fact, the last time India and Australia played ODI cricket at the Wankhede Stadium, the home team suffered heavy defeats in March 2012, losing by 221 runs and five wickets in the last two ODIs of the three-match series.

# SHASTRI LIVID WITH ROHIT SHARMA'S POOR CAPTAINCY AS DEAN ELGAR PUNISHES INDIA BOWLERS AFTER LUNCH ON DAY 2 OF 1ST TEST



**NEW DELHI :** Shastri livid with Rohit Sharma's poor captaincy as Dean Elgar punishes India bowlers after lunch on Day 2 of 1st Test Former India head coach Ravi Shastri was livid with Rohit Sharma's captaincy after lunch on Day 2 of the Boxing Day Test against South Africa at the Supersport Park in Centurion. The Test match hung in balance with South Africa at 49/1 after India put 245 on the board in their first innings. Considering the overhead conditions and movement on offer in the pitch, one would have hoped India come out all guns blazing to push the South African batters on the backfoot in the post-lunch session but what transpired for the the first 40 minutes of the second session was a flurry of boundaries from the bat of Dean Elgar and Tony de Zorzi.Former India head coach Ravi Shastri was livid with Rohit Sharma's captaincy after lunch on Day 2 of the Boxing Day Test against South Africa at the Supersport Park in Centurion. The Test match hung in balance with South Africa at 49/1 after India put 245 on the board in their first innings. Considering the overhead conditions and movement on offer in the pitch, one would have hoped India come out all guns blazing to push the South African batters on the backfoot in the post-lunch session but what transpired for the the first 40 minutes of the second session was a flurry of boundaries from the bat of Dean Elgar and Tony de Zorzi. Shardul's historic seven-wicket haul the last time they toured South Africa must have played a part in it. Otherwise, there is not much logic to let him bowl the first over after the lunch break and then follow it up with debutant Prasidh Krishna from the other end.

# KL RAHUL'S LOVE AFFAIR WITH CENTURION CONTINUES AS INDIA STAR CREATES NEW CENTURY RECORD WITH GRITTY 101 VS SOUTH AFRICA




**NEW DELHI :** It was an innings laced with enormous composure and grit, as KL Rahul battled fierce spells and overcast conditions to notch his 8th Test century during the opening match of the series against South Africa in Centurion. This was his second three-figure mark in Tests at the venue, becoming the first overseas cricketer to achieve this feat. Rahul smashed his century in 133 balls, displaying a mix of defensive acumen and attacking prowess throughout his innings on the first and second day of the Test. Interestingly, this match is also Rahul's first as designated wicketkeeper-batter in Test cricket. Rahul arrived at the crease in a tricky situation, with India reeling at 92/4; the side had lost the key wicket of Shreyas Iyer (31) after a 68-run stand. Soon after his arrival, Virat Kohli (38) also departed, leaving Rahul as the sole designated batter in the lineup. On a tough surface at the Supersport Park, Rahul put faith in his game and forged key partnerships with the tailenders. He formed a 43-run partnership for the seventh wicket before Rabada struck again, dismissing Shardul Thakur, caught by Dean Elgar for 24. Despite the fall of wickets, Rahul continued to challenge the opposition, swiftly accumulating 70 runs off 105 balls and guiding India beyond the 200-run mark.

# 'CA LOOKING AT THREE-MATCH TEST SERIES AGAINST INDIA AND ENGLAND IN FUTURE': CEO HOCKLEY



Cricket Australia is looking to increase 'marquee' women's Test series at home against India and England to three matches from the current IND-W vs AUS-W, One-off Test, according to its Chief executive Nick Hockley. The CA top official said the governing body will "keep advocating for more Test cricket" in the women's game.Hockley's comments came after captain Alyssa Healy felt a sense of unfinished business following Australia's historic defeat to India in Mumbai last week. Playing their first Test in India since 1984, Australia were beaten by eight wickets in the IND-W vs AUS-W, One-off Test at the Wankhede Stadium. "We'll keep advocating for more Test cricket as part of multi-format series," he told SEN. "Maybe that's something in the future that we can think about key marquee series going to three Tests." Marquee series for Australia would be against England and India-only, with New Zealand reluctant to schedule women's Tests, according to cricket.com.au. The loss in Mumbai was Australia's first against India in 11 Tests, with Healy saying she would love to be involved in more red-ball cricket. "It would create a real contest over three games. That would be an unbelievable experience for our group, and probably a true test of both sides' abilities," she had said. "The one-off Test, India playing in their home conditions, you'd expect them to be heavy favourites. We would love to have another crack at it, show what we learned and put it into practice." The last women's Test series of more than one match was played way back in 2006, while India had not hosted any red-ball cricket for nine years before 2023.

# RELIEF FROM COLD TO STOMACH PROBLEMS: 5 HEALTH BENEFITS OF MOLASSES \ JAGGERY



Ayurveda states that eating jaggery is very beneficial for digestion. Also, if women want to take special care of their skin, then they should eat jaggery and drink a glass of water daily. Calcium is found in jaggery which is very beneficial and it removes physical weakness forever. Moreover, did you know that Jaggery also known as 'Gud' and 'Molasses' is very beneficial for hiccups? Health benefits of molasses \ jaggery :

1. Jaggery is a very easy and beneficial solution to deal with stomach problems. It is very beneficial in solving gas formation in the stomach and other problems related to digestion. Consuming jaggery after meals helps in digestion.
2. Use of jaggery will be like nectar for you during winter or when you have a cold. Due to its hot nature, it will help in giving you relief from cold, cough, and especially cough. For this, jaggery can be used in milk or tea, and you can also make a decoction of it.
3. Heating jaggery with ginger and eating it lukewarm provides relief from sore throat and burning sensation. With this, the sound also becomes much better. In case of joint pain, the use of jaggery with ginger proves to be very beneficial. Eating ginger with a piece of jaggery daily provides relief from joint pain.
4. Jaggery is also very useful for your skin health. Yes, jaggery helps in cleaning the skin by removing harmful toxins from the blood and also improves blood circulation. Eating a little jaggery every day prevents acne and brings a glow to the skin. It helps heal your skin problems internally.
5. Eating jaggery provides relief from period pain. Some elements are found in it, which help in protecting from the problems of premenstrual syndrome. Moreover, people who have high blood pressure must consume jaggery. It helps in controlling blood pressure.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore.
• Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Advisor: D. K. Pandey B.A.L.L.B.(High Court Mumbai), (ठाणे न्याय कक्षेत)

# सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात कायद्याचा अडथळा; वडिलांकडील रक्तसंबंधातील नातेवाईकांनाच जात वैधता प्रमाणपत्र देण्याची तरतूद

**मुंबई। प्रतिनिधी,**

मराठा समाजाचा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी कुणबी म्हणून ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत किंवा सापडतील त्यांना व त्यांच्या सग्यासोयऱ्यांना सरसकट जात प्रमाणपत्र देण्याची मागणी केली जात असली तरी, त्यात राज्य सरकारचाच कायदा आडवा येणार आहे. केवळ वडिलांकडील रक्तसंबंधातील नातेवाईकांना जात वैधता प्रमाणपत्र देण्याचे कायदेशीर बंधन आहे. २००१ मध्ये त्यासंबंधीचा कायदा करण्यात आला आहे. मराठा समाजाचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला व संवेदनशील असा आरक्षणाचा प्रश्न



सोडविण्यासाठी त्यांना सरसकट कुणबी जातीची प्रमाणपत्रे देण्यात यावीत, अशी नवी मागणी पुढे आली आहे. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी ही मागणी लावून धरली आहे. राज्यात शासकीय, निमशासकीय नोकऱ्यांमधील व शिक्षणसंस्थांमधील प्रवेशातील आरक्षणासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्ग यांना प्रथम मूळ जातीचे प्रमाणपत्र घ्यावे लागते. त्यानंतर पडताळणी समितीकडून त्याची वैधता तपासावी लागते, त्यानंतरच आरक्षणाचा लाभ दिला जातो. राज्य सरकारने त्यासाठी कायदा केला आहे. राज्यात २००१ पासून या कायद्याची अंमलबजावणी सुरू आहे.

या कायद्याच्या अनुच्छेद १८ (१) नुसार राज्य सरकारने नियम तयार केले असून १४ नोव्हेंबर २०१७ रोजी त्यासंबंधीची अधिसूचना प्रसृत करण्यात आली आहे. त्यात पडताळणी समितीने दिलेले अर्जदाराच्या रक्तसंबंधातील वडिलांचे किंवा सख्ख्या चुलत्याचे किंवा वडिलांकडील रक्तसंबंधातील इतर कोणत्याही नातेवाईकांचे वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास तो महत्त्वाचा पुरावा मानून सक्षम प्राधिकाऱ्याने जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करावे, अशी तरतूद आहे. त्यामुळे आरक्षणासाठी कोणत्याही मागास जातीच्या उमेदवाराला फक्त वडिलांकडील रक्तसंबंधातील नातेवाईकांना जातीचे व वैधता प्रमाणपत्र देणे, कायद्याने बंधनकारक आहे. सरसकट सर्वच नातेवाईकांना जातीचे प्रमाणपत्र देत येत नाही.

# 'अर्बन हाट'वर पालिकेचा दावा, सिडकोच्या भाडेपट्टा करारास महापालिकेची हरकत

**नवी मुंबई। प्रतिनिधी,**

शहरातील एक महत्त्वाचा शासकीय टापू असणाऱ्या सीबीडी बेलापूर भागातील एका निसर्गरम्य टेकडीवर सिडकोने दोन दशकांपूर्वी वसविलेल्या अर्बन हाट (कलाग्राम) या कला, खाद्यसंस्कृती आणि सांस्कृतिक उपक्रमांचे मिश्रण असलेल्या सांस्कृतिक केंद्रावर नवी मुंबई महापालिकेने दावा सांगितला आहे. वेगवेगळ्या राज्यांतील समृद्ध आणि वैविध्यपूर्ण हस्तकला, कलावस्तूंच्या व्यापक प्रदर्शनांचे ठिकाणासाठी प्रसिद्ध असणारे हे केंद्र पुढील दहा वर्षांसाठी भाडेपट्ट्यावर देण्याचा प्रस्ताव सिडकोने तयार



केला आहे. या प्रस्तावास हरकत घेत महापालिकेने हे संपूर्ण केंद्र महापालिकेस चालविण्यास द्यावे अशा स्वरूपाचा नवा प्रस्ताव सिडकोपुढे ठेवला आहे.

नवी मुंबईसारख्या शहरात देशातील वेगवेगळ्या प्रांतातील लोककलेला एक बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी सिडकोने सीबीडी बेलापूर सेक्टर १५ येथील मध्यवर्ती ठिकाणी काही वर्षांपूर्वी अर्बन हाटची उभारणी केली.

सिडकोच्या बहुचर्चित कलाग्राम उपक्रमाच्या माध्यमातून बेलापूर रेल्वे स्थानकामागे असलेल्या एका निसर्गरम्य टेकडीवर पाच हेक्टर क्षेत्रफळात या प्रकल्पाची उभारणी करण्यात आली. निसर्गरम्यतेमुळे हे स्थान विरंगुळ्यासाठी योग्य ठरल्याने सुरुवातीच्या काळात या ठिकाणी फेरफटका मारण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी होती. याशिवाय या ठिकाणी सिडकोमार्फत कला, खाद्यसंस्कृती आणि वेगवेगळे सांस्कृतिक उपक्रमही नियमित भरविले जात असतात. विविध राज्यांमधील समृद्ध आणि वैविध्यपूर्ण हस्तकला, कलावस्तूंचे व्यापक प्रदर्शन तसेच विक्री केंद्र येथे उभे राहावे यासाठी सिडकोने नेमलेल्या खासगी संस्थेकडून प्रयत्न केले जात असतात. ग्रामीण कलावंतांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी बाजारपेठ मिळवून देण्याच्या दृष्टीनेही राज्य सरकारच्या वेगवेगळ्या विभागांमार्फत या ठिकाणी प्रदर्शो भरविली जात असतात.

# ज्येष्ठ नागरिकाकडून अल्पवयीन मुलींशी अश्लील कृत्य



**पुणे। प्रतिनिधी,**

घरासमोर खेळणाऱ्या मुलींशी अश्लील कृत्य करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाविरुद्ध वारजे पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एकाने वारजे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, एका ज्येष्ठ नागरिकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार कर्वेनगर भागात राहायला आहे.

तक्रारदाराची सात वर्षांची मुलगी आणि शेजाऱ्यांची आठ वर्षांची मुलगी घरासमोर असलेल्या पटांगणात खेळत होत्या. त्यावेळी ज्येष्ठ नागरिक तेथे आला. त्याने अल्पवयीन मुलींशी अश्लील कृत्य केले. त्यानंतर ज्येष्ठ नागरिकाने सोसायटीच्या आवारात खेळणाऱ्या मुलींशी पुन्हा अश्लील कृत्य केले. मुलींनी याबाबतची माहिती पालकांना दिल्यानंतर तक्रार देण्यात आली. ज्येष्ठ नागरिकाविरुद्ध बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक जाधव तपास करत आहेत.

# हिंजवडीत कंपनीतील गॅसभट्टीच्या स्फोटात २० कामगार जखमी; चार कामगारांची प्रकृती गंभीर

**पिंपरी। प्रतिनिधी,**

हिंजवडी टप्पा एकमधील ॲकॉर्ड ॲटॉकॅम्प प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतील गॅसभट्टीचा स्फोट होऊन झालेल्या दुर्घटनेत २० कामगार जखमी झाले. जखमींपैकी चार कामगारांची प्रकृती गंभीर असून आठ कामगारांना उपचारानंतर घरी सोडून देण्यात आले. ही घटना मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास घडली. याप्रकरणी कंपनीचे मालक, प्रशासन तसेच, इतर देखभालीचे काम पाहणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सैफन इस्माईल शेख (वय २५,



रा. चिंचवड), राजनंद सुरेश कौशल्य (वय २७, रा. राक्षेवाडी, माण), लखन सुशील बिझारी (वय ३८, रा. मारूंजी), नागेशकुमार (वय २४) अशी गंभीर जखमी झालेल्या चार कामगारांची नाव आहेत. सागर लक्ष्मण सोलसे (वय ३५, रा. शेळकेवाडी, घोटावडे) या कामगाराने हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास १९ कामगार हे वाहनांचे सुट्टे भाग (ॲटोमोबाईल्स पार्ट्स) चारचाकी वाहनाच्या गॅस भट्टीच्या ओव्हन मशिनमध्ये कोटींग करीत होते. यावेळी गॅस भट्टी गरम होवून त्यामध्ये अचानक स्फोट झाला. गॅसभट्टीमधील पावडर कोटींगसाठी ठेवलेले सुट्टे भाग आणि आगीमुळे १९ कामगार जखमी झाले. जखमींना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. रावेत येथे उपचार घेत असलेल्या चार कामगारांची प्रकृती गंभीर असून २० ते २५ टक्के भाजले आहेत. तर, हिंजवडीत सात कामगारांवर उपचार सुरू असून त्यांच्या हात, पाठीला भाजले आहे. अन्य आठ कामगारांना उपचारानंतर घरी सोडून देण्यात आले आहे. कामाच्या ठिकाणी स्फोटक गॅस भट्टीची नियमित देखभाल दुरुस्ती करणे गरजेचे असताना त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याप्रकरणी कंपनीच्या मालकासह प्रशासन व इतर देखभालीचे काम पाहणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक सोन्याबापू देशमुख तपास करीत आहेत.

# ठाणे जिल्ह्यात वर्षभरात सव्वा दोन लाख वाहनांची नोंदणी

**ठाणे। प्रतिनिधी,**

ठाणे जिल्ह्यात १ जानेवारी ते २६ डिसेंबर या कालावधीत सव्वा दोन लाख वाहनांची नोंदणी झाली आहे. यामध्ये सर्वाधिक नोंदणी ठाणे, मिरा भाईंदर आणि भिवंडी शहरात झाली आहे. येथील वाहन नोंदणीची संख्या १ लाख १० हजार ५३१ इतकी आहे. वाहनांमध्ये सर्वाधिक विक्री दुचाकी आणि मोटारींची झाली आहे. तर २०२२ मध्ये याच कालावधीत २ लाख १७ हजार ४५८ वाहनांची विक्री झाली होती. त्यामुळे जिल्ह्यात वाहनांच्या संख्येत दरवर्षी वाढ होत असल्याचे चित्र आहे. ठाणे जिल्ह्यात गेल्याकाही वर्षांपासून मोठ्याप्रमाणात नागरिकरण वाढले आहे. असे असले तरी अरुंद रस्ते



आणि दुसरीकडे वाहनांची संख्या वाढत असल्याने वाहतुक कोंडीचा फटका वाहन चालकांना सहन करावा लागतो. यावर्षी ठाणे जिल्ह्यात २ लाख २६ हजार ६०९ वाहनांच्या विक्रीची नोंद करण्यात आली. यामध्ये सर्वाधिक वाहनांची विक्री ठाणे, मिरा भाईंदर आणि भिवंडी शहरात करण्यात आली आहे. त्यापाठोपाठ कल्याण, डोंबिवली आणि नवी मुंबई शहरात वाहनांची नोंद झाली आहे. ठाणे, मिरा भाईंदर आणि भिवंडी शहरात १ लाख १० हजार ५३१ वाहनांची नोंदणी झाली आहेत. तर डोंबिवली ते बदलापूर येथील ग्रामीण आणि शहरी भागात ७८ हजार ११० वाहनांची नोंद झाली आहे. नवी मुंबईमध्ये ३७ हजार ९६८ वाहनांची नोंद झाली आहे. सर्वाधिक विक्री दुचाकींची झाली आहे. तसेच खासगी मोटार विक्रीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र आहे. ठाणे, मिरा भाईंदर आणि भिवंडी शहरात ७१ हजार १४१ दुचाकींची विक्री झाली. तर २१ हजार ६६५ नव्या मोटारींची नोंदणी झाली आहे. उर्वरित वाहनांमध्ये खासगी आणि व्यावसायिक वाहनांचा सामावेश आहे.

# हॉटेलच्या वाहन चालकाने केली मोटरीतून दागिन्यांची चोरी



**मुंबई। प्रतिनिधी,**

हॉटेलच्या वॅलेट पार्किंगमधील वाहन चालकाने मोटरगाडीतील दागिने चोरल्याचा प्रकार उघडकीस आणण्यात बोरीवली येथील एमएचबी पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी आरोपीला अटक करून त्याच्याकडून सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. तक्रारदार दर्शिल डोडिया (३४) हे माटुंगा किंग्स सर्कल परिसरातील रहिवासी आहेत. ते बोरीवली पश्चिम येथील एका हॉटेलमध्ये १७ डिसेंबरला दुपारी गेले होते. त्यावेळी तेथे उभ्या केलेल्या मोटरीतून २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरीला गेले होते. हॉटेलमधून बाहेर आल्यावर हा प्रकार डोडिया यांच्या लक्षात आला. त्यानंतर त्यांनी याप्रकरणी एमएचबी पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला होता.या गुन्ह्यांच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुधीर कुडाळकर व पोलीस निरीक्षक गुन्हे सचिन शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक निलेश पाटील व त्यांच्या पथकाने तपासाला सुरूवात केली. यावेळी घटनास्थळावरील विविध १० ते १२ सीसीटीव्ही चित्रीकरणाची तपासणी केली असता हॉटेलच्या वॅलेट पार्किंगमधील चालक रमेश बंडू शिंदे (३३) याने डोडिया यांचे दागिने चोरल्याचे निष्पन्न झाले. शिंदे याने पार्किंगच्या बहाण्याने डोडिया यांचे वाहन ताब्यात घेतले. काही अंतरावर तो वाहन उभे करताना दिसला व पुन्हा काही वेळातच तेथून संशयास्पद रितीने दुसरीकडे वाहन घेऊन गेला. काही वेळानंतर पुन्हा त्याच ठिकाणी वाहन आणून उभे केले. त्यामुळे वॅलेट पार्किंगच्या चालकावरील संशय बळावल्याने त्यास ताब्यात घेऊन चौकशीला सुरूवात केली.

# भरारी पथकांची निष्क्रियता वाळू माफियांच्या पथ्यावर, जिल्ह्यात सर्वत्र दिवस रात्र अवैध वाळू उपसा

**ठाणे। प्रतिनिधी,**

जिल्ह्यातील नदीपात्रातील आणि खाडीपात्रातील अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी काही महिन्यांपूर्वी ठाणे जिल्हा प्रशासनातर्फे भरारी पथकांची स्थापना करण्यात आली होती. सुरुवातीच्या काळात भरारी पथकांच्या धडक कारवाईमुळे अवैध रेती उपसा पूर्णपणे बंद झाला होता. या पथकांची धडक मोहीम आता मात्र थंडावल्याने वाळू माफियांना मोकळे रान मिळाले असून मुंब्रा दिवा खाडीत रेतीचा दिवसाढवळ्या अवैध रेती उपसा मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे दिसून येत आहे.



अशीच परिस्थित कल्याण डोंबिवली येथील खाडी परिसरात देखील दिसून येत आहे. यामुळे जिल्हा महसूल विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. ठाणे जिल्ह्यातील दिवा, मुंब्रा, ठाणे, कल्याण येथील खाडी पत्रातून तसेच उल्हासनगर येथील नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात बांधकामासाठी लागणारी वाळू उपलब्ध होते. गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत जिल्ह्यातील रेतीचा अधिकृत लिलाव थांबल्याने येथून अधिकृत वाळू उपसा होत नाही. यामुळे जिल्हा प्रशासनाला मोठ्या महसुलाला मुकावे लागत आहे.

दुसरीकडे अधिकृत रीत्या होणारा वाळू उपसा जरी थांबला असला तरीही माफियांनकडून मोठ्या प्रमाणात रेतीचा अवैध उपसा सुरू आहे. काही महिन्यांपूर्वी मुंब्रा खाडीत रेतीचा दिवसाढवळ्या अवैध उपसा करणाऱ्या माफियांविरुद्ध जिल्हा महसूल अधिकारी कारवाई करिता गेले असता, त्यांच्यावर माफियांकडून हल्ला करण्यात आला. या हल्ल्यातून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पथक थोडक्यात बचावले. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील वाळू माफिया विरोधात सातत्याने धडक कारवाई करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने भरारी पथकांची स्थापना करण्यात आली होती. पाच ते सहा महिन्यांपूर्वी या भरारी पथकांची स्थापना करत खाडी आणि नदीपात्रातून अवैध पद्धतीने वाळू उपसा करणाऱ्या माफी आणि विरोधात धडक कारवाई सत्र जिल्हा प्रशासनाने सुरू केले होते.

# बरे झालेल्या मनोरुग्णांचा घरी जाऊन आढावा; आरोग्य विभागाची योजना!




**मुंबई। प्रतिनिधी,**

देशभरात मनोरुग्णांची संख्या वेगाने वाढत असून त्यांना योग्य प्रकारचे उपचार मिळण्याची नितांत गरज आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या आरोग्य विभागाच्या मनोरुग्णालयांमधून उपचारानंतर बरे झालेल्या रुग्णांच्या प्रकृतीचा घरी जाऊन नियमित आढावा घेण्याबरोबर, त्यांना औषधेही घरपोच देण्याची योजना आरोग्य विभागाने तयार केली आहे. सुमारे २९०० रुग्णांसाठी ही योजना राबविण्यात येणार असून या रुग्णांसाठी प्रतिरुग्ण वार्षिक दहा हजार रुपयांपर्यंत औषधांचा खर्च येणार आहे.

आरोग्य विभागाची ठाणे, पुणे, नागपूर, रत्नागिरी या चार ठिकाणी प्रादेशिक मनोरुग्णालये असून या रुग्णालयांमध्ये मिळून ५,६९५ खाटा आहेत. तर एकूण ५८९२ रुग्ण दाखल असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. अनेकदा रुग्ण बरा झाल्यानंतरही नातेवाईक रुग्णाला घरी नेण्यास इच्छुक नसतात. तर काही प्रकरणात घरी नेल्यानंतरही विशिष्ट औषधे डॉक्टरांच्या सल्ल्याने द्यावी लागत असल्याने नियमितपणे रुग्णालयात तपासणीसाठी नेणे आवश्यक असते. रुग्ण वा त्याच्या नातेवाईकांना अनेकदा हे शक्य होत नसल्यामुळे तपासणी व औषधोपचारात खंड पडून रुग्णाची प्रकृती पुन्हा बिघडून मनोरुग्णालयात दाखल करण्याची पाळी येते. याशिवाय मुंबई न्यायालयाने बरे झालेल्या रुग्णांना मनोरुग्णालयामधून घरी पाठविण्याचे आदेश दिले आहेत.

# करंजा-कोंढरीमध्ये २५ दिवसांतून एकदाच पाणी; ग्रामस्थांमध्ये संताप



**उरण। प्रतिनिधी,**

स्वातंत्र्यपूर्व काळापासून पाण्यासाठी वणवण करणाऱ्या करंजा-कोंढरी येथील अनेक वस्त्यांना पुन्हा एकदा पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून २५ दिवसांतून एकदा पाणी येत असल्याने येथील ग्रामस्थांची पिण्याच्या पाण्याची प्रतीक्षा कायम आहे. त्यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. तर आणखी किती वर्षे पाणीटंचाई सहन करायची असा सवाल केला जात आहे. याचा जाब विचारण्यासाठी १ जानेवारीला ग्रामस्थ आंदोलन करणार आहेत. करंजा-कोंढरी आणि परिसर हा तालुक्यातील सर्वात मोठ्या चाणजे ग्रामपंचायतीचा भाग आहे. जवळपास ३० हजार लोकवस्ती आहे. तर कोंढरी परिसरात दहा हजारपेक्षा अधिक लोकवस्ती आहे. या विभागाला पाणीपुरवठा करण्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या योजना राबविण्यात आल्या आहेत. मात्र तरीही येथील पाण्याचा प्रश्न न सुटल्याने करंजा येथील ग्रामस्थांनी उरण तहसील कार्यालयावर मोर्चा काढून आक्रोश केला होता. त्यानंतर काही महिने आठवड्यातून सात दिवसांनी पाणी येऊ लागले होते. मात्र पुन्हा एकदा यामध्ये वाढ झाली आहे.

# ठाणे स्थानकात प्रवाशांना घेराव घालून तिकीट तपासणी

**मुंबई। प्रतिनिधी,**

विनातिकीट प्रवाशांना पकडण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाने मोहिम हाती घेतली आहे. नियमित तिकीट तपासणीसह आता विशेष तिकीट तपासणी केली जात आहे. नुकतीच दादर रेल्वे स्थानकात विशेष तिकीट तपासणी करण्यात आली तर, मंगळवारी ठाणे स्थानकात प्रवाशांना घेराव घालून तपासणी (फोर्ट्रेस चेक) करण्यात आली. त्यात एकूण १,३०९ विनातिकीट प्रवाशांना पकडले असून ४,१९,२३५ रुपये दंड वसूली केली. द्वितीय श्रेणी डब्यातील सर्वाधिक विनातिकीट प्रवासी पकडण्यात आल्याचे समोर आले आहे.

करोना काळानंतर प्रवाशांची संख्या हळूहळू वाढू लागली असताना, विनातिकीट प्रवाशांचा



प्रवास अधिक होत असल्याचे मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांच्या निर्दशनास आले. त्यामुळे मध्य रेल्वेच्या तिकीट विक्रीच्या संख्येवर आणि त्यावरील महसुलावर परिणाम होत होता. परिणामी, मध्य रेल्वेने विशेष तिकीट तपासणी मोहीम सुरू केली आहे. सीएसएमटीनंतर सर्वाधिक गर्दीच्या स्थानकामध्ये ठाणे स्थानक आहे. ट्रान्स हार्बर, मुख्य मार्ग यावरून लाखोंच्या संख्येने प्रवाशांचा प्रवास होतो. त्यामुळे ठाणे स्थानकाची ओळख गर्दीचे स्थानक म्हणून आहे. या स्थानकातून विनातिकीट प्रवाशांची संख्याही अधिक असल्याने त्यांना अटकाव घालण्यासाठी मंगळवारी विशेष तिकीट तपासणी मोहीम राबवण्यात आली. ठाणे स्थानकातील पादचारी पूल, फलाट व इतर ठिकाणी ५८ तिकीट तपासणीस, १२ आरपीएफ जवान तैनात केले. या पथकाकडून द्वितीय श्रेणी डब्यातून प्रवास करणारे विनातिकीट प्रवासी सर्वाधिक पकडण्यात आले. पथकातील प्रत्येक तिकीट तपासणीसाने २३ हून अधिक जणांना पकडून प्रत्येकी ७,४८६ रुपयांची दंडवसुली केली, अशी माहिती मध्य रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.

# शक्ती कायद्याला केंद्र सरकारचा खोडा, दीपिका चव्हाण यांची तक्रार



**मालेगाव। प्रतिनिधी,**

महाविकास आघाडीने राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी कठोर शिक्षेची तरतूद असलेला 'शक्ती' कायदा संमत केला. मात्र हा कायदा भारतीय दंड संहितेतील काही तरतुदींचा अधिक्षेप करणारा असल्याचे कारण पुढे करत केंद्रातील भाजप सरकारने या महत्वपूर्ण कायद्याला खोडा घातल्याची तक्रार माजी आमदार व राज्य महिला आयोगाच्या सदस्या दीपिका चव्हाण यांनी केली आहे. या संदर्भात चव्हाण यांनी नागपूर येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन हा कायदा तातडीने लागू करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा मागणीचे निवेदन दिले. राज्यातील लहान-मोठ्या शहरांमध्ये महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. अशा घटनांमधील आरोपींना तत्काळ कडक शासन व्हावे आणि पीडित महिलांना न्याय मिळावा म्हणून महाविकास आघाडी सरकारच्या काळात विधानसभेत 'शक्ती' कायदा संमत केला गेला होता. यामध्ये गुन्हेगारांना तत्काळ कठोर शिक्षेच्या तरतुदीदेखील करण्यात आल्या आहेत. मात्र शक्ती कायद्यातील काही बाबी भारतीय दंड संहितेतील तरतुदींचा अधिक्षेप करणाऱ्या असल्याचे कारण पुढे करीत केंद्र सरकारने या महत्वपूर्ण कायद्याला आक्षेप घेत त्यात खोडा घालण्याचे काम केले, अशी तक्रार चव्हाण यांनी निवेदनात केली.

# देहूरोड, दिघी रेडझोन हद्दीचा अचूक नकाशा प्रसिद्ध होणार, महापालिकेने घेतला 'हा' निर्णय




**पिंपरी। प्रतिनिधी,**

देहूरोड आणि दिघी भागातील संरक्षित जागेची (रेडझोन) महापालिका नव्याने मोजणी करणार आहे. त्यासाठी एक कोटी १३ लाख ६७ हजार मोजणी शुल्क भूमी अभिलेख विभागाच्या पिंपरी-चिंचवड आणि हवेली विभागाकडे जमा करण्यात येणार आहे. मोजणीमुळे नवीन अचूक, स्पष्ट रेडझोनचा नकाशा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे रेडझोनच्या सीमेबाबतचा संभ्रम दूर होईल. पिंपरी-चिंचवड शहरालगत देहूरोड आणि दिघीत संरक्षण विभागाचे क्षेत्र आहे. देहूरोड दारूगोळा कारखान्याच्या आणि दिघी मॅगझिन डेपोच्या बाह्यसीमा भिंतीपासून दोन हजार यार्ड (१.८२ किलोमीटर) परिघामध्ये रेडझोन आहे. रेडझोनमध्ये कोणतेही बांधकाम करता येत नसतानाही अनधिकृतपणे निवासी बांधकामे मोठ्या प्रमाणात झाली आहेत. जुने, बैठे घर असलेल्या रहिवाशांना नव्याने बांधकाम करता येत नाही. रेडझोनच्या हद्दीमध्ये नागरिकांमध्ये संभ्रम असल्याने मोजणीची मागणी केली जात होती. महापालिका रेडझोन बाधित क्षेत्राची मोजणी करणार आहे. पिंपरीतील भूमी अभिलेख विभागाच्या नगर भूमापन अधिका-यांकडून देहूरोड दारूगोळा कारखान्याच्या बाह्य सीमा भिंतीपासून दोन हजार यार्ड परिघातील शहरातील हद्दीची मोजणी केली जाणार आहे. त्यासाठी एक कोटी सात लाख रुपये शुल्क दिले जाणार आहे. तर, हवेली भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक हे दिघी मॅगझिन डेपोच्या बाह्यसीमा भिंतीपासून दोन हजार यार्ड रेडझोन परिसराची मोजणी करणार आहेत.

# ज्येष्ठांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांच्या उपाययोजना काय?



**मुंबई। प्रतिनिधी,**

सांस्कृतिक वारसा लाभलेल्या विलेपार्ल्यासह मुंबईतील ज्येष्ठ नागरिकांना विविध समस्यांना समोरे जावे लागते. या समस्या कशी दूर करता येतील? एकटया राहणाऱ्या ज्येष्ठांच्या सुरक्षेचे काय? कायदा-सुव्यवस्थेचे आव्हान पोलीस कसे पेलतात, आदी विषय थेट मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्याकडून जाणून घेण्याची संधी पार्लेकरांना मिळणार आहे. मुली आणि महिलांच्या सुरक्षेचे काय? बदलत्या सामजिक वातावरणात शहरातील कायदा-सुव्यवस्थेचे आव्हान पोलीस कसे पेलणार? याविषयी नागरिकांना पोलिसांची भूमिका समजून घेता येईल. पश्चिम द्रुतगती मार्गाजवळ अनेकदा वाहतूक कोंडी निर्माण होते. विमानतळ परिसरात नेहरू रस्ता तसेच सहार रस्त्यावर सायंकाळी वाहतूक कोंडीमध्ये वेळ वाया जातो. पार्लेश्वर मंदिराकडून पूर्व-पश्चिम प्रवास करतानाही वाहतूक मंदावते. उपनगरात विविध ठिकाणी चाललेल्या विकासकामांमुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीचा प्रश्न उद्भवतो.

पार्ल्यात वाहनतळाचीही समस्या आहे. याशिवाय, अन्य समस्या पोलिसांच्या मदतीने कशा सोडवता येतील, हे पार्लेकरांना जाणून घेता येईल. शहरातील शांतता अबाधित राहावी यासाठी दक्ष असणाऱ्या पोलीस यंत्रणेशी संवादाचे हे पर्व आहे. मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर या कार्यक्रमात नागरिकांशी संवाद साधणार आहेत.

# दुचाकीच्या धडकेत महिला पोलीस अधिकारी गंभीर जखमी

**मुंबई। प्रतिनिधी,**

भरधाव वेगात असलेल्या दुचाकी चालकाने एका महिला पोलीस अधिकाऱ्याला जोरदार धडक दिल्याची घटना मंगळवारी मध्यरात्री मुलुंड परिसरात घडली आहे. या अपघातात महिला पोलीस अधिकारी गंभीर जखमी झाली असून मुलुंड पोलिसांनी दुचाकी चालकाला अटक केली आहे. मुलुंड पोलीस ठाण्याच्या बाहेर मंगळवारी मध्यरात्री बाराच्या सुमारास ही घटना घडली आहे.

याच पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक पूजा धाकतोडे या मंगळवारी रात्री काही सहकाऱ्यांसह परिसरात गस्त घालण्यासाठी निघाल्या होत्या. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला पोलीस व्हॅन उभी असल्याने त्या रस्ता ओलांडताना अचानक एक दुचाकी भरधाव वेगात तेथे आली. या दुचाकीवर तिघेजण होते. त्यांनी



महिला अधिकाऱ्याला जबर धडक दिल्याने महिला अधिकारी काही अंतरावर जाऊन आदळली. पोलीस ठाण्यासमोरच हा भीषण अपघात झाल्याने तत्काळ पोलीस ठाण्यातील इतर कर्मचाऱ्यांनी महिला अधिकाऱ्याला एका खासगी रुग्णालयात दाखल केले आहे. या अपघातात त्यांच्या नाकाला आणि तोंडाला जबर मार लागला असून त्यांच्यावर सध्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. मुलुंड पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून दुचाकी चालक अरविंद यादव याला अटक केली आहे.